स्थायी समितीच्या **बुधवार दिनांक 31–10–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 10. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 11. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 12. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 13. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 14. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 15. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 16. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. राम जोशी, अति. आयुक्त (1) (महसुल व विकास)
2. श्री. अजिज शेख, अति. आयुक्त (2) (सामान्य)
3. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 336ः– {लोककर्म झोन 2} प्रभाग क्र. १३ ड येथिल दाभा चौक ते वायुसेना गेट पर्यंत रस्त्याच्या डांबरिकरणाचा कामाकरिता प्राप्त ४ निविदाकारांपैकी मे. शांती इंटरप्राईजेस यांची जुन्या प्राकलनिय दरापेक्षा ८.७१ प्रतिशतने कमी दराची रू. ३१,५५,५१६/– ची निविदा निम्नतम दराची आहे. वाटाघाटी केल्यावर कंत्राटदाराने जून्या प्राकलनिय राशीपेक्षा ९.२१ टक्के प्रतिशत कमी दरावर काम करण्यास सहमती दर्शविली आहे. नविन दराची तूलना केल्यास वाटाघाटीत प्राप्त दर १९.३७ टक्के प्रतिशतने अधिक आहेत.

निम्नतम निविदा मंजुरीबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 337ः—** {क्रीडा व सांस्कृ. विभाग}

नागपूर महानगरपालिकेचे गणेश नगर स्केटिंग रिंक (प्रभाग क्र. ३१) कंत्राटी पध्दतीने ३ वर्ष चालविण्याकरीता निविदा काढण्यात आलेली होती. चार निविदाधारकांमधून मे. नवनाथ एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर असोसिएशन सर्वात जास्त म्हणजेच रू. ६२,१११/— प्रति महिना म.न.पा. ला प्रदान करण्याबाबत दर नमुद केलेला असल्यामुळे निविदेतील शर्ती व अटीनुसार गणेश नगर स्केटिंग रिंक ३ वर्ष मे. नवनाथ एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर असोसिएशन यांना उपरोक्त दरान्वये चालविण्याकरीता देण्याचा प्रश्न स्थायी समितीने विचारात घेण्यास्तव तथा अनुमती करीता सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 338ः—** {कार्य. अभि.प्रकल्प}

शासननिर्णय क्र.:— नगर विकास म.न.पा. २०१७/प्रकरण क्र. १७०/नवि दि. २०.०२.२०१८ अन्वये महानगरपालिका योजने अंतर्गत महाराष्ट्र शासन नगर विकासामार्फत दक्षिण—पश्चिम विधानसभा क्षेत्रातील ११२ कामे ज्यांची किंमत रू. ७४.७८ कोटी आहे व कस्तुरचंद मैदानावर सोयी सुविधा उपलब्ध करणे करीता रू. ५ कोटी शासन तर्फे मंजूर करण्यात आले आहे. सदर शासन निर्णय नुसार या विकास कामांचे त्रयस्थ पक्ष तांत्रिक लेखा परिक्षक करण्यात यावे असे निर्देश आहे.

शासन निर्णय क्रमांक :—संकीर्ण २०१६/प्र.क्र.३३५/नवि ३३ मंत्रालय मुंबई ३२ यांचे दिनांक २८ मार्च, २०१८ मध्ये त्रयस्थ पक्षाच्या काम करणाऱ्या विविध संस्थाची नावीका सुची (एमपॅनेल लिस्ट) व दर नमूद आहे.

त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या तांत्रिक लेखा परिक्षणासाठीचे दर नामीक सुची वरील (एमपॅनेल लिस्ट) मधील संस्थेकडून ५० ते १०० कोटी किंमतीचे कामास्तव ०.७० टक्के दर नमूद आहेत.

शासकीय तंत्रनिकेतन नागपूर ही संस्था (एनपॅनले लिस्ट) मध्ये नमूद आहे करीता, नागपूर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेतंर्गत दक्षिण—पश्चिम नागपूर मतदार संघातील विविध विकास कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण करण्यास्तव शासकीय तंत्रनिकेतन नागपूर या संस्थेला ०.७० टक्के दरावर कामे देण्याचे मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 339ः—** {प्रकल्प विभाग}

नागपूर शहरातील वर्धा रोड, हॉटेल रेडिसन ब्लु पासून जयताळा रोडपर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम व रूंदीकरण करणे या कामाकरीता रूपये ५३,१०,८१,७०९/— च्या निविदा राशीचे शासकीय विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे. मधुकॉन प्रोजेक्ट्स लि. यांची प्राकलनिय दरापेक्षा ०.९९ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ५२,५८,२४,०००/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्रशासकिय मान्यता रक्कम रूपये ६२,९५,९२,५७२/— असून या कामावर निविदाकाराचा देकार रूपये ५२,५८,२४,०००/— + १२ टक्के जीएसटी रूपये ६,३०,९८,८८०/— असे एकूण ५८,८९,२२,८८०/— ची निविदा मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 340ः—** {लकडगंज झोन 8}

प्रभाग क्र. 23 अ अंतर्गत हिवरीनगर एच. आय. जी. कॉलोनी येथे श्री शेंडे ते भुखंड क्र. 6 पर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 58,90,857/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

सदर कामास मा. अध्यक्ष स्थायी समीती यांनी पद क्र. A42001470511 मधून आर्थिक वर्ष 2018—19 मध्ये रु. 58,90,860/— राशीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 341ः—** {आरोग्य विभाग}

आरोग्य विभागाच्या सर्व झोन, हिवताप व हत्तीरोग तसेच इतर विभागासाठी खालील नमूद किटकनाशक औषधी विभागाचे निविदा

मंजुर दरकरार दरावर खरेदी करण्याचे प्रस्तावित असून मागणिनिहाय अहवाल व निविदा मंजुर दर तसेच एकूण खर्चाचे विवरण खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | किटकनाशक औषधीचे नाव | बाजार दरानुसार | वर्ष २०१८—१९ करीता मागणी | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | Temiguard 50% | Rs,1450/-Ltr | 1500 Ltr | 21,75,000/- |
| 2 | B.T,I, | Rs,1495/-Ltr | 3000 Ltr | 44,85,000/- |
| 3 | Laksya (Deltramethrine) | Rs,2150/-Ltr | 500 Ltr | 10,75,000/- |
| 4 | Pyrosene oil | Rs,0750/-Ltr | 1000 Ltr | 7,50,000/- |
| 5 | Aquatain, T.M.T. (Green B) | Rs,4945/-Ltr | 500 Ltr | 24,72,500/- |
| 6 | Neemtex | Rs,0910/- Ltr | 3000 Ltr | 27,30,000/- |
| 7 | Aqua Pyrethrum 2 % Extract | Rs,2185/- Ltr | 200 Ltr | 4,37,000/- |
| | | | Total Rs, | 1,41,24,500/- |

वरिल नमूद वार्षीक खरेदीवर रु. १,४१,२४,५००/— खर्च अपेक्षीत राहील. यावर होणारा खर्च म.न.पा.चे व्यय पद क्र. ६०६ (A४४२०१२७२२०२) व २०६ (A२३१०१२२२७०२) किंवा इतर पदा मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 342ः—** प्रभाग क्र. ३७, अत्रे लेआऊट येथील मैदानाचा विकास करणे **{कार्य. अभि. (प्रकल्प)}** रूपये ३१९०२२६/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, आर. एस. नायडु यांची प्राकलनिय दरापेक्षा ११.१६ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २८३४१९७/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्र. मा. रक्कम रूपये ३६२०९०६/— असुन या कामावर निविदाकाराचा देकार रूपये २८३४१९७/— + १२ टक्के जीएसटी रूपये ३४०१०४/— असे एकुण रूपये ३१७४३०१/— ची निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 343ः—** **{लकडगंज झोन 8}** प्रभाग क्र. 23 अ अंतर्गत शास्त्रीनगर येथे श्री घुसे ते श्री चावके यांचे घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 30,36,206/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

सदर कामास मा. अध्यक्ष स्थायी समीती यांनी पद क्र. A42001470511 मधून आर्थिक वर्ष 2018—19 मध्ये रु. 30,36,210/— राशीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 344ः—** **{लकडगंज झोन 8}** प्रभाग क्र. 23 ब अंतर्गत पुर्व वर्धमान नगर येथे श्री भोजणे ते पूनयानी व श्री माखेजा ते भोयर यांचे घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 44,47,785/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

सदर कामास मा. अध्यक्ष स्थायी समीती यांनी पद क्र. A42001470511 मधून आर्थिक वर्ष 2018—19 मध्ये रु. 44,47,790/— राशीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 345ः—** **{लकडगंज झोन 8}** प्रभाग क्र. 23 ब अंतर्गत देशपांडे ले आउट येथे श्री जयपूरीया ते श्री अग्रवाल यांचे घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 48,33,731/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

सदर कामास मा. अध्यक्ष स्थायी समीती यांनी पद क्र. A42001470511 मधून आर्थिक वर्ष 2018—19 मध्ये रु. 48,33,740/— राशीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 346ः—** प्रभाग क्र. 23 ब अंतर्गत देशपांडे ले आउट येथे श्री केवलानी
**{लकडगंज झोन 8}** ते श्री शाह यांचे घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 29,82,168 ⁄— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

सदर कामास मा. अध्यक्ष स्थायी समीती यांनी पद क्र. A42001470511 मधून आर्थिक वर्ष 2018—19 मध्ये रु. 29,82,170 ⁄— राशीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 347ः—** प्रभाग क्र १ ड अंतर्गत सुशिला ले — आऊट येथील रोडचे
**{मंगळवारी झोन 10}** डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. ४८,१३,४२४/— (अठ्ठेचाळीस लक्ष तेरा हजार चारशे चौवीस रूपये फक्त ) रक्कमेच्या प्राकलणास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 348ः—** प्रभाग क्र. 18 भुतेश्वरनगर येथे हत्ती नाल्याची आर.सी.सी. संरक्षण
**{स्लम विभाग}** भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 03 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. एस. के. एंटरप्राईजेस यांची प्राकलनीय दरापेक्षा 03.11% टक्के कमीवर असलेली रूपये 63,96,574 ⁄— (रूपये त्रेसष्ठ लक्ष, छयान्नव हजार पाचशे चौऱ्यात्तर फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच,

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 349ः—** प्रभाग क्र. 27 — अ अंतर्गत बापूनगर, मिरे ले—आऊट व गुरूदेव
**{लोककर्म झोन 05}** नगर रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण काम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तिन निविदाकाराची निविदांपैकी मे. फोनिंक्स इंजीनिअरींग यांची प्राक्कलनीय दराची रू. ५८,८५,२१२/— रकमेची निम्नतम निविदा असुन नविन CSR प्रमाणे तुलना केल्यास रू. ४७,२८,६७८/—(GST सह) आहे. मे. फोनिंक्स इंजीनिअरींग यांच्याशी दर वाटाघाटी करण्यात आली असुन त्यांनी सदरील काम नविन CSR प्रमाणे प्राकलनीय दरावर रू. ४७,२८,६७८/— (GST सह) करण्यास लेखी सहमती दिली आहे.

करीता मे. फोनिंक्स इंजीनिअरींग यांची १९.६५% कमी दराची रू. ४७,२८,६७८/— (GST सह) रकमेची सुधारीत दराची निविदा मंजुरी प्रदान करणे व स्थायी समिती ठराव क्र. ६६ दिनांक १६.०४.२०१८ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार नविन आर्थिक वर्षात तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 350ः—** आरोग्य विभागाचे हिवताप व हत्तीरोग विभागाकरिता
**{आरोग्य विभाग}** शहरातील दहा झोन अंतर्गत मोठया प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव होत असतो सोबतच शहराच्या विविध भागात मोठ—मोठे डबके पाण्याने तुडुब भरलेले असतात. त्या मध्ये डासाची उत्पत्ती मोठया प्रमाणात होते. त्यावर एम.एल.ओ. किटक नाशक फवारणी केल्याने डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण राखण्यास मदत होते. फवारणी करिता २४००० लिटर एम.एल.ओ. ऑईल खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्रमांक १२७ दिनांक ०४/०८/२०१७ नुसार में. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशिन, कल्याण यांचे वार्षिक दरकरार दर प्रति लिटर रुपये १७२/— प्रमाणे मान्य असुन त्याच दरावर वर्ष २०१८—१९ करिता एम.एल.ओ. ऑईल २४००० लिटर खरेदीवर एकुण रुपये ४१,२८,०००/— खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च आय—व्यय पद क्रमांक A44201272202 (नागरी घनकचरा व्यवस्थापन) या मधुन करण्याचे प्रस्तावित आहे. करिता एम.एल.ओ. ऑईल खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 351</u>:— स्थायी समिती ठराव क्र. १७६ दि. १९/०७/२०१८ अन्वये {आरोग्य विभाग} नागपुर मनपा अंतर्गत येत असलेल्या कब्रस्तानावर सुध्दा आवश्यक त्या सामुग्री मोफत देण्यात येवून तसा स्वतंत्र प्रस्ताव स्थायी समितीला सादर करावा या सुचनेच्या आधीन राहुण खालील प्रमाणे प्रस्ताव आहे.

मनपा द्वारे अधिकृत कब्रस्तानावर दफन विधी करिता लागणाऱ्या सामुग्री च्या विषयी दरपत्रक प्राप्त करण्यात आले असुन करकाझी मजलीस मुस्लिम कब्रस्तान भानखेडा यांनी दिलेल्या दरसुचीतील दर पुढील प्रमाणे दिले आहे.

| | |
|---|---|
| १) बडगा टट्टा | — ७५०रु |
| २) कबर खुदाई | — ६५०रु |
| ३) डोला पहुचाई | — ३००रु |
| | ................ |
| एकुण | रु १६५० |
| | ................ |

दफन विधीकरिता वरील प्रमाणे प्रतीशव अंदाजीत एकुण रु. १६५०/— खर्च अपेक्षित राहील नागपुर म.न.पाच्या अंतर्गत अधिकृत कब्रस्तानावर प्रति शव दफन विधी करण्यासाठी दोन वर्षाकरिता दरकरार निश्चित करण्याचा तसेच प्रतिशव दफन सामुग्री पुरविण्या करिता निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 352</u>:— {लोककर्म झोन 10} महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत प्रभाग क्र. 22 जागनाथ स्वामी मंदीर हाऊस ऑफ चांदकरे ते श्री ओम स्टील पर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्ता तयार करण्याच्या प्राकलनीय रक्कम रू.5967709/— असलेल्या निविदा किंमत रू. 5269428/— च्या कामाकरीता प्राप्त 3 निविदांपैकी मे. आर एस नायडु यांच्या, निविदा किंमती पेक्षा 10.88 टक्के कमी दराच्या रू.46,96,114/—च्या प्रथम निम्नतम निविदेस तथा त्यावरील 12 टक्के जी.एस.टी. रू. 5,63,534/— व चाचणी शुल्क रू. 65,950/— सह एकुण रू. 53,25,598/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 353</u>:— महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने {लोककर्म झोन 6} अंतर्गत प्रभाग क्र. 18 अशोक चौक येथे नागनदी च्या भिंतीचे बांधकाम करण्याच्या प्राकलनीय रक्कम रू.48,94,477/— असलेल्या निविदा किंमत रू.43,66,408/— च्या कामाकरीता प्राप्त 4 निविदापैकी मे. एन एन बेलखुडे यांच्या, निविदा किंमती पेक्षा 15.00 टक्के कमी दराच्या रू. 37,11,447/—च्या प्रथम निम्नतम निविदेस तथा त्यावरील 12 टक्के जी.एस.टी. रू.445374/— व चाचणी शुल्क रू.4100/— सह एकुण रू.41,60,921/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, नारा घाटावर जाळण्याकरीता गोवरी मिळत नाही. आरोग्य अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की गोवरीच्या संदर्भात बिल प्राप्त झाले आहे ज्यावेळी त्या घाटावर गोवरी मिळत नाही मग बिल कसे आले हे चेक करण्यात यावे. त्याचबरोबर जागोजागी कचऱ्याचे डब्बे लावण्यात आले आहे त्यामध्ये कचरा भरुन राहते ते कोणी साफ करीत नाही, नागरिक त्याला आग लावतात. कचऱ्याचे डब्बे साफ करण्यात यावे, सफाई कर्मचाऱ्यांना हाताला बांधण्यासाठी जी घडयाळ देण्यात आली आहे ती बंद राहते, त्यामुळे त्यांचे 30 दिवसांचे 18 दिवस हजेरी लागत आहे. व त्याप्रमाणे त्यांना पगार मिळत आहे हे तपासण्यात यावे. सफाई कर्मचाऱ्यांनी जितके दिवस काम केले आहे त्याप्रमाणे त्यांचे पगार निघाले पाहिजे. घडयाळ प्रमाणे पगार काढण्यात येवु नये. प्रभाग 1 नारा येथे निर्मल नगर येथील पाण्याची टाकी सकाळी 8 वाजता सुरु करण्यात यावी. त्या ठिकाणी मोलमजुरी करणारे लोक असल्यामुळे त्यांना पिण्याचे पाणी भरण्यासाठी त्रास होवु नये या दृष्टीने उपाययोजना करण्यात यावी.

सभापती :– मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे इन्होंने जो सूचना की है इसपर प्रशासन तुरंत ध्यान दे। सफाई कर्मचारींयों को जो घडी दी गयी है अगर सही मायने मे वह घडी काम नही कर रही है तो उसपर तुरंत ॲक्शन लेना चाहियें। मा.सदस्य के साथ मे चर्चा करके इसपर तुरंत कारवाई करनी चाहिये।

श्री.जुल्फेखार भुट्टो :– मा.सभापती महोदय, ओ.सी.डब्लु. व्दारा पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्याकरीता खड्डे खोदण्यात आले आहे. परंतु त्या ठिकाणी पॅचेसचे काम करण्यात आले नाही. हे काम त्वरीत करण्यात यावे.

सभापती :– मा.सदस्य श्री. जुल्फेखार भुट्टो इनके सूचना पर प्रशासन ध्यान दे।

श्री.सुनिल हिरणवार :– मा.सभापती महोदय, मेरे प्रभाग के एक व्यक्ती को कुत्तेंने काटने के बाद उसे महानगरपालिका के दवाखाने मे रेबीज के इंजक्शन के लिये भेजा गया पर वहा उसे इंजेक्शन नही दिया गया। महानगरपालिका के कौन–कौनसे दवाखाने मे इंजेक्शन दिये जाते है इस बात की जानकारी दि जायें।

आरोग्य उपसंचालक (श्री.चव्हाणे) :– मा.सभापती महोदय, महानगरपालिकेच्या इंदीरा गांधी रुग्णालय, महाल रोगनिदान केंद्र, सदर रुग्णालय, या ठिकाणी सकाळी 8 ते 2 वाजेपर्यत रेबीज चे इंजेक्शन देण्यात येते. परंतु कुत्रा चावल्यानंतर तुरंत इजेक्शन दया असा लोकांचा अट्टहास असतो हे बरोबर नाही. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या नियमाप्रमाणे कुत्रा चावल्याच्या 10 दिवसाच्या आंत कुत्रा मेला तर व्हॅकसीन देण्यात यावे परंतु कधी कधी रेबीज चे इंजेक्शनचे दुष्परीणाम बॉडीवर होवु शकते या दृष्टीने उपाययोजना अंमलात आणणे आवश्यक आहे.

सभापती :– नागपूर महानगरपालिकेच्या दवाखान्यात कुत्रा चावल्यानंतर रेबीजचे इंजेक्शन किती कालमर्यादेनंतर देणे आवश्यक आहे या संदर्भात दवाखान्याच्या दर्शनी भागाच्या फलकावर सूचना लावण्यात याव्या.

<u>ठराव क्रमांक 354</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर